# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक १२.०८.२०२६ बुधवार**

**१) मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक १२.०८.२०२६ रोजी मा. विशेष न्यायाधिश पोक्सो कोर्ट तथा जिल्हा न्यायाधीश—१३, व अती. सत्र न्यायाधिश, नागपुर, श्री. एन. आर. तालेकर साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ५५७/२०२३ मधील, पोलीस ठाणे मानकापुर येथील अप. क्र. २८२/२०२३ कलम ३८६, ३५४(ड), ३५४(अ), २९४, ५०६(ब), ३७६(२) भा.दं.वि., सहकलम १२ पोक्सो या गुन्ह्यातील आरोपी मोहम्मद आझम राशीद खान, वय २८ वर्षे, रा. रोझ कॉलोनी, जाफर नगर, नागपूर याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस ५०६(२) भा. दं.वि. कायद्यान्वये ०२ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०२ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा तसेच, आरोपीस ५०९ भा.दं.वि. कायद्यान्वये ०१ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०२ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत राहणारी फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये सन २०१९ मध्ये इन्स्टाग्रामवर ओळख होवुन त्यांचेमध्ये बोलणे—चालणे होते. दिनांक १०.०७.२०२० चे १८.०० वा. ते दिनांक १७.०८.२०२३ चे २३.३० वा. चे दरम्यान, आरोपीने फिर्यादी हिला पैशाची गरज आहे असे म्हणुन वारंवार पैशाची मागणी केली. फिर्यादीने नकार दिला असता, आरोपीने फिर्यादीस ‘‘तेरे घरपे आके तेरे मा—बाप को मार दुंगा’’ तसेच बदनामी करण्याची धमकी देवुन व जिवे मारण्याची धमकी देवुन, फिर्यादीकडुन रोख १,५०,०००/—रू. व सोन्या—चांदीचे दागिणे असा एकुण २,४०,०००/—रू. चा मुद्देमाल जबरदस्तीने घेतला. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक १८.०८. २०२३ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तपासी अधिकारी तत्कालीन मसपोनि. श्रीमती भारती गुरनुले मॅडम यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती रश्मी खापर्डे मॅडम यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. दिक्षीत यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. जफरूद्दीन काझी, मपोहवा. स्वाती बोरकर यांनी काम पाहिले.

**२) पोलीस आयुक्त, नागपुर शहर परिमंडळ क्रमांक ०५ अंतर्गत संघटीत गुन्हेगारीविरूध्द प्रभावी कारवाई.**

मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उप आयुक्त, परि. क्र. ०५, नागपुर शहर यांनी माहे जुलै २०२६ मध्ये पोलीस ठाणे यशोधरानगर, कळमणा व भांडेवाडी हद्यीतील एकुण ०४ गंभीर गुन्हयामध्ये २७ आरोपींविरूध्द म.को.का. कायद्याअंतर्गत कारवाई केली असुन, १२ गॅंग हिस्ट्रीशिट उघडुन ५८ आरोपीतांना प्रतिबंधात्मक निगराणीमध्ये समाविष्ठ केले आहे.

- पोलीस ठाणे भांडेवाडी अप. क्र **१२१**/२०२६ कलम १०९, २९६,३(५) बी.एन.एस. मधील गुन्हयात ०३ आरोपीतांविरूध्द म.को.का. अन्वये कारवाई करण्यात आली.

- पोलीस ठाणे यशोधरानगर अप.क्र. ३८९/२०२६ कलम १०९(१),१८९(२),१८९(४),१९० भारतीय न्याय संहिता यामधील गुन्हयात १० आरोपीतांविरूध्द म.को.का. अन्वये कारवाई करण्यात आली,
- पोलीस ठाणे भांडेवाडी अप क्र **१२०**/२०२६ कलम १०९,१८९(२) १८९(४) ३२४(४),३(५)बी.एन.एस. सहकलम ४+२५ भारतीय हत्यार कायदा, कलम १३५ म.पो.का. या गुन्हयात ०७ आरोपीतांविरूध्द म.को.का. अन्वये कारवाई करण्यात आली,
- पोलीस ठाणे कळमणा अप.क्र. ५७३/२६ कलम १०९(१), १८९(२),१९१(२), १९१(३), १९० ११८(१), ११८(२), ११५(२), २९६, ३५१(२), ३(५) भा.न्या.संहिता २०२३ या गुन्हयात ०७ आरोपीतांविरूध्द म.को.का. अन्वये कारवाई करण्यात आली.

| अ. क्र. | पोलीस ठाणे | गॅंग हिस्ट्रीशिट | आरोपी |
|---|---|---|---|
| ०१ | यशोधरानगर | ०४ | १९ |
| ०२ | कळमणा | ०४ | २३ |
| ०३ | वाठोडा | ०१ | ०६ |
| ०४ | भांडेवाडी | ०३ | १० |
| **एकूण** | | १२ | ५८ |

वरील कार्यवाही मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. अपर पोलीस आयुक्त दक्षीण प्रादेशक विभाग, नागपुर शहर यांचे मार्गदर्शनाखाली श्री. नित्यानंद झा, पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र. ०५ नागपूर शहर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली आहे. संघटीत गुन्हेगार, सराईत गुन्हेगार व समाजकंटकाविरूध्द यापुढेही कठोर व सातत्य पुर्ण प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

**३) अप्पर पोलीस आयुक्त दक्षिण प्रभाग कार्यालय येथे गुन्हेगारांचा आदान—प्रदान कार्यक्रम संपन्न :—**

मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे आदेशान्वये व मार्गदर्शनातून नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध १५ पोलीस ठाणे येथे अटक व गुन्हे अभिलेखावरील सक्रीय असे एकूण ५६ आरोपींचे आदान—प्रदान हे दिनांक १२.०८.२०२६ चे १२.०० वा. पोलीस नियंत्रण कक्ष परिसरातील मा. अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) यांचे कार्यालय परिसर येथे पार पडले. आदान—प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत, याबाबत माहितीचे आदान—प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील एकूण १४ अधिकारी व ३७ अंमलदार आरोपींसह हजर होते.

मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. वसंत परदेशी यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली बाबत उपस्थीत पोलीस अधिकारी व अंमलदार यांना समजावुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचा डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा सुचना दिल्या.



**(कामगिरी)**

**१) पोलीस आयुक्तालय, नागपुर शहर, परिमंडळ क्र. ४ अंतर्गत कुख्यात गुंड हद्दपार :—**

पोलीस आयुक्तालय, नागपुर शहर, परिमंडळ क्र. ४ अंतर्गत पोलीस ठाणे नंदनवन हददीत **गल्ली नं. ४, कादरीया मदरसा जवळ, हसनबाग, नागपूर येथे राहणारा गुन्हेगार ईसम नामे मोहम्मद दानिश अली मोहम्मद अर्शद अली, वय २१ वर्षे** याचेविरूध्द पोलीस ठाणे नंदनवन येथे गंभीर स्वरूपाचे विविध ०९ गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता नंदनवन पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. श्रीमती रश्मीता राव पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. ०८/२०२६ दिनांक ११.०८.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला. नमुद गुन्हेगाराचे हद्दपार आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली असुन, नंदनवन पोलीसांनी नमुद हद्दपार ईसमास त्याचे नातेवाईक यांचेकडे सिरोंचा, जि. गडचिरोली येथे सोडलेले आहे.



मोहम्मद दानिश अली

**२) नंदनवन पोलीसांची कामगीरी :— फसवणूक करणारा अट्टल गुन्हेगार अटक. ०६ गुन्हे उघडकीस.**

दिनांक ०२.०८.२०२६ चे ०८.३० वा. चे सुमारास, फिर्यादी सौ. कलम निलकंठ नंदनवार, वय ७० वर्षे, रा. प्लॉट नं. २२, स्वराज विहार कॉलोनी, वाठोडा, पांदन रोड, नागपुर ह्या मार्केटमध्ये भाजी—पाला आणण्याकरीता जात असतांना, पांदन रोडवरील धनश्री बार जवळील गायीचे तबेल्याजवळ एक ईसम मोटारसायकलवरून आला व त्याने फिर्यादीस '' मी तुमचा मुलगा राजेंद्र यास ओळखतो'' असे म्हणुन बहाण्याने त्यांच्या ओळखीच्या गोष्टी करून, मी तुम्हाला मार्केटमध्ये सोडतो, असे म्हणुन फिर्यादीचा विश्वास संपादन केला. फिर्यादी यांनी त्याचेवर विश्वास ठेवुन त्याचे गाडीवर बसल्या. आरोपीने फिर्यादीस व्यंकटेश नगर गेटजवळ आणले व त्यांचे गळ्यातील सोन्याची चैन ०६ ग्राम व टॉप्स ०६ ग्राम असा एकुण १,२०,०००/—रू. चा मुद्देमाल फसवणुक करून घेवुन गेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे आरोपीविरूध्द कलम ३१८(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान नंदनवन पोलीसांनी तांत्रीक तपास करून, मिळालेल्या माहीतीवरून आरोपीस निष्पन्न केले. आरोपी आफताब उर्फ फईम अहेमद शेख, वय ५२ वर्षे, रा. किराडपुरा, पाण्याचे टाकीजवळ, जि. छत्रपती संभाजीनगर यास सापळा रचुन ताब्यात घेतले. आरोपीस गुन्हेसंबंधाने विचारणा केली असता, त्याने वर

नमुद गुन्हा केल्याचे कबुल केले. आरोपीस अधिक सखोल विचारपुस केली असता, त्याने नागपुर शहरात वयोवृध्द महीलांना लॉटरी लागल्याचे आमिष दाखवुन त्यांचेकडुन सोन्याचे दागिने घेवुन फसवणुक केल्याचे सांगीतले. आरोपीने वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत ०१, सक्करदरा हद्दीत ०१, हुडकेश्वर हद्दीत ०१, अजनी हद्दीत ०१ व पो. ठाणे मुकुंदवाडी जि. छत्रपती संभाजीनगर हद्दीत ०१ असे एकुण ०६ फसवणुक व जबरी चोरीचे गुन्हे केल्याचे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन गुन्ह्यातील मुद्देमाल सोन्याचे मनी १० ग्राम, मंगळसुत्र ११ ग्राम, ०१ बांगडी १२ ग्राम, लगड १८ ग्राम, ०२ आयफोन, यामाहा मोटारसायकल असा एकुण किंमती अंदाजे ७,००,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ०४), मा. श्री. रोशन पंडीत, सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. कैलास देशमाने, सपोनि. उमाकांत राठोड, पोउपनि. संतोषकुमार रामलोड, प्रदीप काईट, प्रकाश सिडाम, पोहवा. दिनेश जुगनाहाके, अश्वीन सहारे, शैलेष बडोदेकर, युवानंद कडु, पोअं. प्रविण मरापे, राहुल खडतकर, सोमेश्वर घुगल, संजय मोकदम, रोहन चौधरी, राकेश म्हैसकर, हिमांशु पाटील, अभीषेक पांडे व मपोहवा. स्वाती कुमरे यांनी केली.




**<u>३) यशोधरानगर पोलीसांची कामगीरी :— जेसिबी चोरीचा गुन्हा उघडकीस.</u>**

दिनांक १४.०७.२०२६ चे २१.०० वा. ते दिनांक १५.०७.२०२६ चे ०७.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी योगेश चंद्रकांतजी मुंडले, वय ४० वर्षे, रा. प्लॉट नं. १२३, पाहुणे ले—आऊट, उप्पलवाडी, भिलगांव, नागपुर यांची पिवळ्या रंगाची जेसिबी इंडीया लि. मॉडेल ३ डिएक्स मशीन किंमती २५,००,०००/—रू. ची ही त्यांचे ड्रायव्हरने पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, प्लॉट नं. ०१, नागलोक कॉलोनी, बॅक ऑफ इंडीया जवळ, भिलगांव येथे लॉक करून, पार्क करून ठेवली होती. दुसरे दिवशी फिर्यादीने जेसिबी मशीन ठेवलेल्या जागी पाहली असता, तेथे जेसिबी मशीन दिसुन आली नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची जेसिबी मशीन चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, यशोधरानगर पोलीसांनी तांत्रीक तपास करून व गुप्त बातमीदार मार्फतीने मिळालेल्या माहीतीवरून आरोपी शेख ईरफान शेख जब्बार, वय ३३ वर्षे, रा. प्लॉट नं. ६०९, गरीब नवाज नगर, यशोधरानगर, नागपुर यास ताब्यात घेवुन, त्याचे ताब्यातुन नमुद जेसिबी मशीन जप्त केला. त्यास विचारपूस केली असता, त्याने नमुद जेसिबी हा पाहीजे आरोपी आरीफ खान, रा. शिवनी, मध्यप्रदेश याचे सांगण्यावरून एका अनोळखी चालकाने त्यास दिल्याचे सांगीतले. आरोपीस गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ०५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. युनुस चॉद शेख, पोउपनि. निलकंठ नन्नावरे, पोहवा. गणेश गुप्ता, रवि आहीर, पोअं. लक्ष्मण पडवाल, अमोल भेंडेकर व रितेश दुधे यांनी केली.




**४) वाडी पोलीसांची कामगीरी :— ऑटोरिक्षा चोरी करणाऱ्या आरोपीस अटक. एकुण ०३ गुन्हे उघडकीस.**

दिनांक १०.०८.२०२६ चे २३.४५ वा. ते दिनांक ११.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी धनराज सदाशिव देवासे, वय ५५ वर्षे, रा. घर नं. २८५, सोनबा नगर, अशोका बुध्द विहार जवळ, खडगांव रोड, वाडी, नागपुर यांनी त्यांचा पिवळ्या रंगाचा तीन चाकी ऑटो क्र. एम.एच. ४९ ई ५३५२ किंमती ८०,०००/—रू. चा आपले घराचे वॉल कम्पाऊंड बाहेर लॉक करून, पार्क करून ठेवला असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचा ऑटो चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(ब) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, वाडी पोलीसांनी तांत्रीक तपास करून व गुप्त बातमीदार मार्फतीने मिळालेल्या माहीतीवरून आरोपी पंकज उर्फ राहुल पंडीत जाधव, वय २८ वर्षे, रा. सोनबा नगर, वाडी, नागपुर यास ताब्यात घेवुन, त्यास विचारपूस केली असता, त्याने वर नमुद ऑटो चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन चोरी गेलेला ऑटो जप्त करण्यात आला. आरोपीस अधिक सखोल विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे वाडी हद्दीत दुकानाचे शटर तोडुन ०२ घरफोडीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीकडुन एकुण ०३ गुन्हे उघडकीस आणलेले आहेते. आरोपीस गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषीकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ०१), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीन मगर, सपोनि. कुणाल धुरट, पोहवा. नागेश्वर, रोशन, राहुल नागदेवे, राहुल बोटरे, सोमेश्वर, दिलीप व विनोद यांनी केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे राणाप्रताप नगर :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक १२.०८.२०२६ चे ०८.१५ वा. चे सुमारास, राणाप्रताप नगर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, ओरीएंट वाईन शॉप जवळ, त्रिमुर्ती नगर येथे एक हद्दपार इसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम पोलीसांना दिसुन आला. त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळुन जाण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अंकुश किशोर जमरे, वय ३० वर्षे रा. गल्ली नं. ९, संत तुकडोजी नगर, कामगार नगर, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ३९६६/२०२५ दिनांक २०.०९.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. प्रविण मसराम यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणाप्रताप नगर येथे पोउपनि. प्रशांत खोत यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे कळमना :—** दिनांक १२.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे सुमारास, मुलगा नामे सागर संजयकुमार मेलवानी, वय १७ वर्षे, रा. सुंदर अपार्टमेंट, पारडी, नागपुर व त्याचा मित्र भौमिक अमोल लारोकर, वय १६ वर्षे, रा. सुभान नगर, पारडी, नागपुर असे दोघे त्यांचे मित्राचे कार क्र. एम.एच. ४९ सिएस ०४२७ ने पोलीस ठाणे कळमना हद्दीत भरतवाडा वाय पॉईन्ट कडुन भरतवाडा चौकाकडे येणाऱ्या रोडवरील रिध्दी दुकानाचे समोरील नवकन्या रोड कटींग जवळुन जात असतांना, कारची रोडवर उभ्या ट्रकला धडक लागल्याने, कारचालक व दोघे असे तिघेही गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी सागर व भौमिक यांना तपासुन मृत घोषीत केले. जखमी कारचालक याचा उपचार तारांगण हॉस्पीटल येथे सुरू आहे.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. निवृत्ती फड यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे गणेशपेठ :—** दिनांक ११.०८.२०२६ चे ०८.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, बस स्थानक जवळ एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ३२ वर्षे वयाचे, आजारी व बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे वार्ड नं. ५२ मध्ये दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक १२.०८.२०२६ चे ०८.३० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे गणेशपेठ येथे संपर्क साधावा.

यापकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे सपोनि. गाडगे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | मा. जिल्हा न्यायाधीश–२२, तथा अती सत्र न्यायाधिश, नागपूर | ५२९/ २०२४ | कलम ३५३, ३३२, २९४, ५०६, ३४ भा.दं.वि. | ज्ञानेश्वर उर्फराजु पांडुरंग केदार, वय ३४ वर्षे, रा. प्लॉट नं. ४३, गांगुली ले–आऊट, सोमलवाडा, सोनेगांव, नागपुर. | २१.०८.२०२६ |
| २ | मा. १५ वे सह दिवाणी न्यायाधीश क–स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०४०१२९ /१९९७ | कलम ३४६ भा.दं.वि. | बंडु मारोतराव गोटेकर, रा. राजीव नगर झोपडपट्टी, नागपुर. | २०.०८.२०२६ |

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## वाहतुक शाखेची प्रेसनोट

वाहतूक परिमंडळ एम.आय.डी.सी. हद्दीत महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे कल्पतरू प्रोजेक्टस् इंटरनॅशनल लिमीटेड कडुन लोकमान्य नगर ते हिंगणा गावापर्यत महाराष्ट्र मेट्रो रेलची उभारणी करणार आहे. सदर कामादरम्यान झोन चौक ते आय. सी. चौक पर्यत मेट्रो मार्गाचे बांधकाम करण्याकरीता वाहतूक वळविणे आवश्यक आहे, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**इंडियन ऑयल पेट्रोल पंप ते झोन चौकाकडे जाणारा मुख्य रस्ता बंद करण्यात येत असून, वाहतूक खालील प्रमाणे मार्गावर वळविण्यात येत आहे.**

- हिंगणा कडून नागपूर कडे जाणारी वाहतूक हि इंडियन ऑयल पेट्रोल पंपकडुन सर्व्हीस रोडने झोन चौक पर्यत जातील.

**सदरची अधिसूचना दिनांक १३.०८.२०२६ ते दिनांक १०.०९.२०२६ रोजी पावेतो अमंलात राहील.**

नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

**स्वा/–**
**(आदित्य मिरखेलकर, भापोसे)**
पोलीस उप आयुक्त, वाहतुक,
नागपूर शहर.